नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०७/१२/२०२५ ( रविवार )**

# गहूहीवरा रेल्वे पुलीया यावरून अवजड वाहतूकीस बंदी असलेले आदेशाचे काटेकोर पालन करणे बाबत नागपुर ग्रामीण पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन

पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत येत असलेल्या तारसा रोडवरील गहुहिवरा चौकात महारेल कडून सन २०२३ साली रेल्वे रूळावर पुलाचे बांधकाम करण्यात आले होते. सदर पुलावर ३५ ते ४० टन पर्यंत जड वाहतुक होवू शकते असे सांगण्यात आले होते. सदर जड वाहनाकरिता पर्यायी रोड असतांना देखील टोल चुकविण्याच्या उद्येशाने ५० ते ६० टन पर्यंतची अवजड वाहने वाहतुक होत आहे. त्यामुळे पुलावर दोन बाजुमध्ये मधोमध ५ ते ६ इंच पर्यंत अंतर पडले आहे. यापुढे अशाच प्रकारे जडवाहतुक होत राहली तर पुलाचे नुकसान होवून पुलाचे दोन्ही बाजुला असलेल्या लोकांच्या रहत्या वसत्यांवर पुल कोसळून जिवितहानी व मालमत्ता हानी होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू शकतो. याकरीता दिनांक ११/११/२०२५ रोजी पारीत झालेल्या मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या आदेशान्वये **१२/११/२०२५ ते दिनांक ११/०२/२०२६ रोजी पर्यंत नमुद मार्गावरील अवजड वाहतुक वळविण्यात आली आहे.**

**श्री संतोष गायकवाड, उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान आणि पोलीस निरीक्षक श्रीमती वैजयंती मांडवधरे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कन्हान यांनी . यासंबंधाने पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत येणारे सर्व ट्रान्सपोर्ट चालवीणारे मालक/चालक यांची वारंवार बैठक घेवुन सर्व ट्रान्सपोर्ट चालवीणारे मालक–चालक यांना सूचना देण्यात आले की, कन्हान तारसा रोडवरील गहूहीवरा रेल्वे पुलीया यावरून अवजड वाहतूकीस बंदी**

असुन नमूद रोडने अवजड वाहतूक करू नका. तसेच लेखी पत्राद्वारे सुध्दा सर्व ट्रान्सपोर्ट चालवीणारे मालक/चालक यांना माहीती देण्यात आली आहे.

नागपुर ग्रामीण पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की गहूहीवरा रेल्वे पुलीया यावरून अवडज वाहतूकीस बंदी असल्याचे आदेशाचे काटेकोर पणे पालन करावे जेणेकरून अपघातास आळा बसेल.






## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा, १ अरोपी अटक,अरोली पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन अरोली :— दिनांक ०७/१२/२०२५ रोजी अरोली पोलीस हद्दीत पेट्रलिंग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मसला घोटी टोक रोडने अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मसला रोड, बसस्टॉप जवळ नाकांबंदी केली असता अशोक लेलॅंड कंपनीचा टिप्पर क्रं एम एच ४९ बी. झेड. ४९४३ हा मिळुन आला. वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक आरोपी नामे **वसीम आलम खान , वय ३१ वर्षे, पत्ता. बडेगाव, ता सावनेर, जि नागपुर** याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना दाखविला. परवान्याबाबत शाहनिशा केली असता सदर परवाना हा बानवटी असल्याबाबत समजले. वाहन मालकाचे नाव विचारले असता आरोपी क्रं

२. कुणाल अरविंद ठाकरे, ३८ वर्षे, रा. प्लॉट नं ९३ वनराई नगर,मानेवाडा बेसा रोड, नागपुर अशी माहीती पोलीसांना प्राप्त झाली. वाहन मालकाच्या सांगण्यावरून चालकाने रेतीची चोरटी वाहतुक केल्याची माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन **१)** १० ब्रास आणि **२)** टिप्पर क्रं एम एच ४९ बी. झेड. ४९४३ आणि ३) एक मोबाईल **असा एकुण ५०,६०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

वाहन चालक /मालक **याच्या** विरूध्द पोस्टे अरोली येथे **कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम , कलम ०३ सार्व. संपत्ती नुकसान प्रतिबंध अधि. सहकलम ५०/१७७ मो.वा.का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.आरोपी चालकाला अटक करण्यात आली असुन मा न्यायालयाने त्याचा दिनांक ०९/१२/२०२५ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजुर केला आहे.**



## पोलीस स्टेशन काटोल हद्दीत सट्टापट्टी चालविणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन काटोल :—** दिनांक ०६/१२/२०२५ रोजी काटोल पोलीसांना गोपनीय माहिती मिळाली की, सरस्वती नगर गार्डनचे आडोशाला काटोल येथे राजेन्द्र गुलाबराव गायकवाड हा काही लोकांकडुन पैसे घेवुन सट्टापट्टीचे आकडे लावुन हारजीतचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले असता सरस्वती नगर गार्डनचे आडोशाला **आरोपी नामे— राजेन्द्र गुलाबराव गायकवाड, रा. सरस्वती नगर , काटोल** हा कागदावर आकडे लिहुन सट्टापट्टी चालवित असतांना मिळुन आला. पोलीसांनी घटनास्थळावरून १) सट्टापटटी आकडे लिहलेला कागद २) नगदी ४७००/— रू ३) मोटोरोला कंपनीचा ॲन्रॉईड मोबाईल किंमती १०,०००/— असा एकुण १४७००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद आरोपी राजेन्द्र गुलाबराव गायकवाड, रा. सरस्वती नगर काटोल याच्या विरूद्ध कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणाऱ्या, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०३ गुन्हे नोंद

दिनांक ०६/१२/२०२५ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू काढणारे तसेच दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू तसेच इतर साहीत्य असा **एकुण १४,३१५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

पोलीस स्टेशन कुही येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन नरखेड येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन बेला येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये एकुण ०३ नोंद केले आहे.

**सदर कारवाईत ८१० मिली देशी दारू, १४० लीटर मोहाफुल दारू तसेच इतर साहीत्य असा एकुण १४,३१५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नाशवंत मुद्देमाल पंचानामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने